ADFACTORS PR
Knowledge-driven communications

| Published Date: | 28 Aug 2018 | Publication: | Nav Rashtra (Marathi) |
| --- | --- | --- | --- |
| Edition: | Nagpur | Page No: | 5 |
| MAV/CCM: | 3473.4/8.27 | Circulation: | 10000 |

# टीसीएस आयटी विझ 4 सप्टेंबरला

**नागपूर.** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने टीसीएस आयटी विझ 2018 या भारतातील शालेय मुलांसाठीच्या सर्वांत मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेच्या नागपूर आवृत्तीची घोषणा केली. ही स्पर्धा 4 सप्टेंबरला नागपूरमधील सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात घेतली जाणार आहे. आठवी ते बारावी इयत्तेत शिकणारे शालेय विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र आहेत. प्रत्येक शिक्षणसंस्था यामध्ये एक किंवा एकाहून अधिक संघ पाठवू शकते. प्रत्येक संघात दोन स्पर्धक असतील. यासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नाही. टीसीएस आयटी विझ ही प्रश्नमंजूषा देशातील अहमदाबाद, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे या 12 ठिकाणी घेतली जाणार आहे. यासाठी संबंधित शिक्षणसंस्थेमार्फत प्रवेशिका 28 ऑगस्टला किंवा त्यापूर्वी क्विझ को-ऑर्डिनेटर, टीसीएस आयटी विझ, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, अग्रवाल हाऊस, बुराडे गल्ली, तेलीपुरा, सिताबर्डी या पत्त्यावर पोहोचणे आवश्यक आहे. www.tcsitwiz.com. या वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणीही करता येईल.